सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: **pldvp@unipune.ac.in**

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.


संदर्भ क्र.: साफुपुवि/निववि/३८९

दिनांक : १४/१२/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'इ—कंटेन्ट डेव्हलपमेंट' या उपक्रमाअतर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२२—२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'इ—कंटेन्ट डेव्हलपमेंट' या उपक्रमाअंतर्गत जोडलेल्या यादीतील 'इ—कंटेन्ट डेव्हलपमेंट' उपकरणास अर्थसहाय्य देण्याचे निश्चित केले आहे. सदर 'इ—कंटेन्ट डेव्हलपमेंट' खरेदी उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत असून सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी गुरूवार, दि. १५/१२/२०२२ ते सोमवार, दि. २६/१२/२०२२ असा राहणार असून सदर प्रस्तावाची एक प्रत नियोजन व विकास विभागाकडे बुधवार दिनांक २८ डिसेंबर, २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**unipune.ac.in—Home page—BOD online—Login—For College Users—College Login & Password—Planning and Development**

आपणास विनंती की, सदर उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी. मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना बंधनकारक राहतील.

महाविद्यालये/परिसंस्थानी ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या प्रस्तावाची छापील प्रत आवश्यक कागदपत्रासहीत विहीत मुदतीत नियोजन व विकास विभागामध्ये जमा न केल्यास तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपली विश्वासू,

डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

**सोबत:** १) मार्गदर्शक तत्वे व इ—कंटेन्ट डेव्हलपमेंट उपकरणे यादी
२) सामाईक नियमावली (एकूण ४ पाने)

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7.

## इ—कन्टेंट डेव्हलपमेंट उपकरणे

अ) इ—कन्टेंट डेव्हलपमेंटसाठी बुलेट कॅमेरा किंवा रेकॉर्डिंग करणारे कॅमेरे, रेकॉर्डर माईक खरेदीसाठी कमाल रु.एक लाख इतके अनुदान तीन वर्षातून एकदा देण्यात येईल. त्यासाठी कमाल रुपये एक लाख एकूण खर्चाच्या ७५:२५ प्रमाणानुसार अनुदान मंजूर करण्यात येईल.

ब) गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत महाविद्यालय/परिसंस्थेने पूर्वी मिळालेल्या अनुदानातून उपकरण खरेदी केलेले असल्यास तेच उपकरण महाविद्यालय/परिसंस्थेस तीन वर्षापर्यंत पुन:श्च खरेदी करता येणार नाही.

क) खरेदी करण्यात येणारी उपकरणे यासाठी तीन अधिकृत पुरवठाधारकांचे कोटेशन व तुलनात्मक तक्ता इ. प्राचार्य/संचालकांच्या सही व शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

ड) महाविद्यालय/परिसंस्थेने वरील नमूद उपकरणे/वस्तू खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्ट्रर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. जर एखादे उपकरण खराब झाले. तर तशी नोंद स्टॉक रजिस्ट्रर मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

इ) सदर उपकरणे/वस्तुंवर स्टॉक रजिस्ट्रर नोंदणी क्रमांक, योजनेचे नाव व खरेदी करण्यात आलेला महिना व वर्ष यांची नोंद करणे आवश्यक आहे.

## E-Content Development Instruments under QIP 2022-23

| Sr. No. | Hardware |
|---|---|
| 1. | Webcam |
| 2. | LCD |
| 3. | Webcam & stand |
| 4. | Mike |
| 5. | Multimedia Speakers |
| 6. | Wireless mouse & Key Board |
| 7. | LED lights |
| 8. | Green screen with frame |
| 9. | White board |

**Softwares**

| Sr. No. | Description |
|---|---|
| 1. | OBS Studio – Available free |
| 2. | Open shot/filmora – Annual Subscription fees upto Rs. 3,000/- |
| 3. | Cam scanner - Available free |

..१

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT *PUNE-7.*

**गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यासाठी सामाईक नियमावली व कार्यनिर्देश मार्गदर्शिका**

१. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था जर संबंधित महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या स्वतंत्र अभिमत/खाजगी विद्यापीठाशी (महाविद्यालय/परिसंस्था विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या नावाने अथवा बदलेल्या नावाने) संलग्नीत झाले असेल तर अशा अभिमत/खाजगी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय/परिसंस्थेला गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

२. **फक्त नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुर्नमूल्यांकन केलेली अथवा मूल्याकंन/पुर्नमूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए. मूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याची चलनाची साक्षांकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना 'इ—कंटेन्ट डेव्हलपमेंट' खरेदी उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.**

३. ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज सादर केला असेल अशा महाविद्यालय/परिसंस्थेचा गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

४. ज्या महाविद्यालयात/परिसंस्थेत प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या शून्य आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थाना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करता येणार नाही. अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थानी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

५. दरवर्षी विद्यापीठ वार्षिक अहवालासाठीची माहिती देणे बंधनकारक आहे. नियोजन व विकास विभागाला वार्षिक अहवालाची माहिती जमा केल्याची पोहोच प्रत, त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाची AISHE व MIS ची माहिती भरली असल्याचे प्रमाणपत्र अथवा ना—हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ निधी (प्रोरेटा) क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रोरेटा तसेच चालू शैक्षणिक वर्षाचे संलग्नीकरणाचे (नूतनीकरण) शुल्क भरलेल्या चलनाची छायाप्रत इ. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

६. गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/परिसंस्थेने प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती सादर केल्यास संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र ठरविण्यात येईल.

७. महाविद्यालय/परिसंस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे/ संलग्नीत असल्याचे विद्यापीठाचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

..२

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

८. महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कायमस्वरुपी/प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक असल्याचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

९. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेतील कायमस्वरुपी मान्यताप्राप्त/प्रभारी प्राचार्य/संचालक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालय/परिसंस्थेतून दुसऱ्या महाविद्यालय/परिसंस्थेत बदली झाली असेल तर संस्थेच्या बदली आदेशाची प्रत तसेच प्राचार्य/संचालक यांची बदली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून झाली असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१०. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नसावी किंवा सुरु नसावी.

११. सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे.

१२. इ–कन्टेंट उपकरणे खरेदीसाठी कोणत्याही संस्थेकडून/वित्तीय विभागाकडून अनुदान घेतलेले नसावे किंवा यापूर्वी विद्यापीठाकडून त्याच साहित्यासाठी अनुदान घेतलेले नसावे. यापूर्वी त्याच साहित्यासाठी अनुदान घेतले आहे असे निदर्शनास आल्यास सदर वर्षामध्ये मंजूर केलेले अनुदान हे रद्द करण्यात येईल व पुढील तीन वर्षापर्यंत अशा महाविद्यालय/परिसंस्थांना इ–कन्टेंट उपकरणे खरेदी अनुदानासाठी अपात्र ठरविण्यात येईल. ज्या उपकरणे खरेदीसाठी अनुदान मंजूर केले आहे, ते उपकरण खरेदी केल्यानंतर पुन्हा तेच उपकरण खरेदी करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

१३. इ–कन्टेंट उपकरणे खरेदीसाठी उपयोगी साहित्य खरेदी ही विद्यापीठाच्या अध्यादेश क्र १५१ मधील तरतूदीनुसार वेगवेगळ्या किमान तीन पुरवठादारांचे/कंपन्यांचे दरपत्रक व तुलनात्मक तक्ता (Comparative Chart) या सर्वांवर प्राचार्याची सही घेऊन शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१४. इ–कन्टेंट उपकरणे खरेदी करण्यासाठी तीन पुरवठादारांची/ कंपन्याची दरपत्रके जर ई–मेल वरुन मागविली असतील तर सदर दरपत्रके ज्या ई–मेल वरुन आले त्या ई–मेलच्या पहिल्या पानाची प्रत व दरपत्रक प्राचार्य/संचालकाच्या सही शिक्क्यासह प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१५. रु. ५०००/– च्या आतील इ–कन्टेंट उपकरणे खरेदी करता येणार नाही.

१६. महाविद्यालय/परिसंस्थेने इ–कन्टेंट उपकरणे खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. इ–कन्टेंट उपकरणाची स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक, योजनेचे नाव व खरेदी करण्यात आलेले महिना व वर्ष याची नोंद करावी. जर एखादे साहित्य खराब झाले तर तशी नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये ठेवावी.

..३

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

१७. खरेदी केलेल्या उपकरणावर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक पुसला जाणार नाही अशा पध्दतीने ठळकपणे नोंदविणे आवश्यक आहे. तसेच अशी उपकरणे विद्यापीठाकडून प्राप्त अनुदानातून खरेदी केलेले आहे. त्यावर सुस्पष्ट व ठळकपणे विद्यापीठाचे व योजनेचे नाव नमूद करणे आवश्यक आहे.

१८. खरेदी केलेल्या इ–कन्टेंट उपकरणाचे प्राचार्य/संचालक यांचेबरोबर असलेले छायाचित्रे अंतिम हिशेब सादर करताना जोडणे आवश्यक आहे. छायाचित्र साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणीचा उल्लेख दिसावा अशा पध्दतीने हवे.

१९. गुणवत्ता सुधार योजनेसाठीचे अनुदानाबाबतचे निर्णय हे संबधित अर्थशिर्षात शिल्लक असलेल्या रकमेच्या अधिन राहून घेतले जातील.

२०. कोणताही प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखीव असतील.

२१. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत छापून (Printout) त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे विहीत मुदतीत सादर करावी. विहीत मुदतीनंतर, अपूर्ण कागदपत्रे जोडलेले, मार्गदर्शक तत्वांनुसार नसलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

**प्रस्ताव सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे**

**unipune.ac.in - Home page - BOD Online – Login - For College Users - College Login & Password - Planning and Development**

..४